महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक

# दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई ● नवी मुंबई ● ठाणे ● पालघर ● रायगड

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे (एम.डी.)

बुधवार ■ २६ नोव्हेंबर २०२५ ■ वर्ष - सातवे ■ अंक : १५१ ■ RNI No. MAHMAR/2016/7209 ■ किंमत - ०२ रुपये

## लक्षवेधी

## रेल्वे स्थानकांच्या विस्तारीकरणाची रखडपट्टी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**शहापूर, ता. २५ (वार्ताहर) :** मध्य रेल्वेच्या १५ डब्यांच्या लोकल ठाणे जिल्ह्यातील शेवटच्या कसारा स्थानकापर्यंत चालविण्यात येणार असल्याचे सांगितले जात आहे. मात्र, कल्याण स्थानकापुढील शहापूर तालुक्यातील वासिंद, आसनगाव, आटगाव, कसारा स्थानकांचा विस्तार रखडल्याने या मार्गावरील प्रवाशांना १५ डब्यांच्या लोकलची प्रतीक्षा करावी लागणार आहे. दरवर्षी लोकल गाड्यांचे वेळापत्रक रेल्वे प्रशासनाकडून अद्ययावत केले जाते. मात्र, यंदा रेल्वे स्थानकांचे विस्तारीकरण प्रलंबित असल्यामुळे हे वेळापत्रकही अद्याप अद्ययावत करण्यात आलेले नाही. रेल्वे स्थानकांचे विस्तारीकरण डिसेंबरपर्यंत दृष्टिक्षेपात होते; परंतु त्यांची रखडपट्टी झाल्याने या विस्तारीकरणाला आता २०२६ वर्ष उजाडणार आहे. शहापूर नजिकच्या आसनगाव स्थानकातून दररोज सर्वाधिक ७५ हजार प्रवासी प्रवास करतात. त्यामुळे हे स्थानक तालुक्यातील महत्त्वाचे स्थानक आहे. असे असूनही त्याच्या विकासाकडे दुर्लक्ष झाल्याचे चित्र आहे. याबाबत मध्य रेल्वेचे जनसंपर्क अधिकारी स्वप्नील नीला यांनी म्हटले, मध्य रेल्वेच्या मुंबई मंडळातील ३४ रेल्वे स्थानकांतील फलाटांचा विस्तार करण्याचे काम सुरू आहे. यातील २७ स्थानकांचे काम डिसेंबरपर्यंत पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे. त्यानंतर १५ डब्यांच्या लोकलची संख्या वाढवण्यात येणार आहे.

## पक्षप्रवेशांमुळे वाड्यात शिवसेनेला मजबूती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**वाडा, ता. २५ (बातमीदार) :** काँग्रेसचे वाडा तालुकाध्यक्ष दिलीप पाटील आणि शिवसेना उद्धव ठाकरे गटाच्या पदाधिकारी तथा माजी उपनगराध्यक्षा नयना चौधरी यांनी नुकताच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते शिवसेनेमध्ये प्रवेश केला. ऐन निवडणुकीच्या धामधुमीत पक्षप्रवेश झाल्याने काँग्रेससह ठाकरे गटाला जबरदस्त धक्का बसला आहे, मात्र या दोन्ही प्रवेशाने शिवसेना मजबूत झाली आहे.

दिलीप पाटील हे ३३ वर्षे काँग्रेसमध्ये कार्यरत असताना १२ वर्षे युवक काँग्रेस अध्यक्ष आणि १५ वर्षे तालुका कमिटी अध्यक्षपदाची धुरा सांभाळली आहे. गेल्या निवडणुकीत त्यांनी काँग्रेसच्या दोन जागा निवडून आणल्या होत्या. त्यांचा कुटूंब, मित्रपरिवार व नातेवाईक यांचा मोठा गोतावळा असून याचा फायदा शिवसेनेला होण्याची शक्यता आहे. त्याचप्रमाणे नयना चौधरी या मागील निवडणुकीनंतर काही काळ त्यांनी उपनगराध्यक्षपदाची धुरा सांभाळली होती. या कालावधीत त्यांनी अनेक विकासकामे केली आहेत. त्यांनाही मानणारा वर्ग वाडा शहरात मोठ्या प्रमाणात असून त्याचा फायदा या निवडणुकीत शिवसेनेच्या उमेदवाराला होण्याचा अंदाज आहे. त्यामुळे महाविकास आघाडीला हा जोराचा धक्का बसल्याची राजकीय वर्तुळात चर्चा सुरू आहे.

## आनंद दिघे उड्डाणपुलावरील अवजड वाहतूक बंदीचे फलक शोभेपुरतेच

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण, ता. २५ (बातमीदार):** ठाण्यातील आनंद दिघे उड्डाणपुलावर अवजड वाहनांना प्रवेशबंदी असल्याचे फलक लावण्यात आले असतानाही प्रत्यक्षात या पुलावरून रोजच अवजड वाहनांची वाहतूक सुरू असल्याचे गंभीर चित्र आहे. काही दिवसांपूर्वीच एका अवजड वाहनाने दुचाकीला धडक दिल्यामुळे हा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. वाहतूक विभागाने यावर अद्याप ठोस पावले न उचलल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सध्या वालधुनी पूल दुरुस्तीच्या कामामुळे वाहतुकीसाठी बंद ठेवण्यात आला आहे. मात्र त्यापूर्वीपासूनच अवजड वाहनांच्या वाहतुकीचा प्रश्न चर्चेत आहे. मागील काही काळापासून एसटी बसेसची या पुलावरील रहदारी पूर्णपणे बंद करण्यात आली असली तरीही इतर अवजड वाहने मात्र बिनदिक्कतपणे वाहतूक करीत आहेत. त्यामुळे पुलाच्या प्रवेशद्वारावरील अवजड वाहनांस प्रवेश बंद हे फलक केवळ शोभेपुरतेच आहेत का, असा संतप्त सवाल नागरिक वाहतूक पोलिसांना विचारत आहेत. या विषयाकडे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) लक्ष वेधले असून, त्यांनी वाहतूक विभागाकडे तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मनसेने दिवसा पूना लिंक रोडवरील अवजड वाहनांना तातडीने बंदी घालावी, अशी मागणी केली आहे.

# मतदार याद्यांचा घोळ !

## भाजप प्रदेशाध्यक्षांच्या अधिकाऱ्यांवर संताप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली:** अंबरनाथ नगरपालिकेच्या निवडणुकीत मतदार याद्यांतील गोंधळ मोठ्या प्रमाणात वाढत आहे. यावरून आता राजकारण तापले आहे. ठाकरे बंधूंनी दुबार व तिबार मतदार मुद्द्यांवर थेट निवडणूक आयोगाला जाब विचारला आहे.

आता सत्ताधारी भाजपनेही या मुद्द्यावर जोरदार आवाज उठवला आहे. ठाकरेंनी निवडणूक याद्यांवर आक्षेप घेतल्यानंतर आता भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनीच स्वतः पुढाकार घेत मतदार यादीतील गैरव्यवहारांवर संताप व्यक्त केल्याने हा विषय अधिकच गंभीर बनला आहे. निवडणूक अधिकाऱ्यांना धारेवर धरत थेट जाब विचारत निवडणूक रद्द करा, अशी मागणी त्यांनी केली आहे.



निवडणूक अधिकाऱ्यांना धारेवर धरत थेट जाब विचारत निवडणूक रद्द करा, अशी मागणी भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केली.

चव्हाण यांनी निवडणूक अधिकाऱ्यांवर सरळसरळ आरोप करत सांगितले की मतदार याद्या अत्यंत बेफिकिरीने आणि जाणीवपूर्वक चुकीच्या पद्धतीने तयार केल्या जात आहेत. "उल्हासनगरमधील मतदारांची नावे अंबरनाथच्या याद्यांमध्ये टाकली जात आहेत. विशिष्ट लोक सांगतील त्या ठिकाणी नावे वाढवली जात आहेत. निवडणुकीच्या याद्या अधिकारी यांच्या बाजूलाच बसून तयार केल्या जातात, असा आमचा स्पष्ट आरोप आहे," असे ते म्हणाले. या परिस्थितीमुळे संपूर्ण निवडणूक प्रक्रियेवर संशयाचे सावट पसरत आहे, असे चव्हाण यांनी म्हटले आहे.

मतदार याद्यांतील प्रचंड गोंधळाचा दाखला देत चव्हाण यांनी थेट संपूर्ण निवडणूकच रद्द करण्याची मागणी निवडणूक अधिकाऱ्यांकडे केली आहे. दोषी अधिकाऱ्यांना सोडणार नाही, त्यांच्या विरोधात कायदेशीर कारवाई केली जाईल, असा कठोर इशाराही त्यांनी दिला. निवडणुकीच्या अगदी तोंडावर चव्हाण यांची अशी तीव्र प्रतिक्रिया आल्याने प्रशासनासमोर नवीन संकट उभे राहिले आहे.

दुबार-तिबार नावे, चुकीच्या प्रभागात केलेला नावांचा समावेश, हेतुपुरस्सर फेरफार केल्याचे आरोप आणि निवडणूक अधिकाऱ्यांच्या निष्पक्षतेवर उठलेले प्रश्न... या सगळ्यांमुळे मतदार यादीचा गोंधळ दिवसेंदिवस वाढतच आहे. एकीकडे विरोधक तर दुसरीकडे सत्ताधारी दोन्ही बाजूंनी एकाच मुद्द्यावर नाराजी व्यक्त केल्याने अंबरनाथमध्ये निवडणुकीचे वातावरण ढवळून निघाले आहे.

या संपूर्ण गोंधळामुळे मतदार यादी सुधारली जाईल का, निवडणूक आयोग कोणती कारवाई करेल आणि निवडणूक रद्द करण्याच्या मागणीवर पुढे काय भूमिका घेतली जाईल, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



### आमदार किसन थोरेंचा करिश्मा

## शिंदे सेनेत गेलेल्या भाजप शहर अध्यक्षांची घरवापसी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** गेल्याच आठवड्यात भाजपला धक्का देत शिंदेंच्या शिवसेनेत प्रवेश केलेल्या भाजपच्या महिला शहर अध्यक्ष दमयंती पवार यांनी पुन्हा भाजपात प्रवेश केला आहे. काही गोष्टींबद्दल वाईट वाटल्याने तडकाफडकी निर्णय घेतला होता, असे त्यांनी यावेळी बोलताना सांगितले.

तर भाजपची हीच खरी संस्कृती असून आपल्या लोकांना सामावून घेण्याची संस्कृती इतर कुठेही नाही, असे यावेळी आमदार किसन कथोरे यांनी सांगितले. या पक्षप्रवेशामुळे भाजपला मोठा धक्का बसला होता. मात्र दोनच दिवसात त्यांची घरवापसी झाली. कुळगाव बदलापूर नगरपालिका निवडणुकांमध्ये भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेत एकमेकांचे पदाधिकारी, नाराज फोडण्यात मोठी संपर्धा लागली होती. गेल्या आठवड्यापर्यंत ही स्पर्धा जोरात होती. डोंबिवलीत शिंदेच्या शिवसेनेचे महत्वाचे पदाधिकारी फोडल्यानंतर थेट केंद्रीय मंत्री अमित शहांच्या कोर्टात या फोडाफोडीचा चेंडू गेला होता. त्यानंतर त्यांनी अशी फोडाफोडी थांबवण्याच्या सूचना दिल्या होत्या. मात्र बदलापुर आणि अंबरनाथमध्ये ही फोडाफोडी अजुनही सुरूच आहे. गेल्या आठवड्यात शिंदेंच्या शिवसेनेचे शहरप्रमुख वामन म्हात्रे यांनी भाजपच्या महिला शहर अध्यक्ष दमयंती पवार यांना शिवसेनेत प्रवेश दिला होता. त्यांच्या या प्रवेशाने शहरात एकच खळबळ उडाली. त्यांच्या जोडीला त्यांचे पती वैभव पवार यांनीही शिवसेनेत प्रवेश केला होता. पवार कुटुंबीय भाजपचे जुने निष्ठावंत मानले जातात. ज्या भागात त्यांचे वास्तव्य आहे त्या भागात त्यांच्या जाण्याने भाजपला धक्का बसू शकत होता. मात्र त्यांच्या शिवसेना प्रवेशाच्या काही तासातच भाजपातील वरिष्ठांनी धावाधाव सुरू केली. स्थानिक माजी नगरसेवक राजेंद्र घोरपडे यांनी यात पुढाकार घेतल्याची चर्चा आहे. त्यानंतर नुकताच दमयंती पवार यांची भाजपात घरवापसी करण्यात आली. यावेळी भाजप आमदार किसन कथोरे यांनी त्यांचे भाजपात स्वागत केले.

### उल्हासनगरच्या

## गृहनिर्माण प्रकल्पावरुन श्रेयवादाची लढाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर**

**उल्हासनगरच्या सर्वांत मोठ्या गृहनिर्माण प्रकल्पामुळे शहरात विकासाची नवी दारे उघडताना दिसत आहेत. या विकासाच्या छायेत आता राजकीय श्रेयवादाचा संघर्ष पेटला आहे. भाजपच्या आमदार कुमार आयलानी आणि शिवसेना (शिंदे गट) चे खासदार डॉ. श्रीकांत शिंदे दोन्ही नेते '३,५७८ परवडणाऱ्या घरांच्या महाप्रकल्पाचे श्रेय' स्वतःकडे खेचण्यास सज्ज झाले आहेत.**

उल्हासनगरातील गरीबांसाठी सुरू होणारा ऐतिहासिक प्रकल्प हजारो कुटुंबांसाठी आशेचा किरण आहे, तसाच सत्ताधारी गटांसाठी तो 'राजकीय शक्तिपरीक्षा' ठरणार असल्याचे चित्र आहे. प्रधानमंत्री आवास योजना २.० (शहरी) अंतर्गत तीन हजार ५७८ परवडणाऱ्या घरांच्या निर्मितीसाठी ७२३ कोटींचा गृहनिर्माण महाप्रकल्प मंजूर झाल्यानंतर शहरात विकासाचा नवा अध्याय सुरू होण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत. संतोषनगर आणि प्रेमनगर टेकडी परिसरातील या आधुनिक व किफायतशीर घरांच्या उभारणीमुळे हजारो गरीब कुटुंबांचे 'घराचे स्वप्न' साकार होणार आहे. परंतु, या प्रकल्पाच्या मंजुरीनंतर शहरात एक वेगळीच राजकीय हलचल निर्माण झाली आहे. भाजप आणि शिंदे गटात श्रेयवादाची लढाई सुरू झाली आहे.

दोन्ही पक्षांच्या प्रचारयंत्रणेने स्वतःच्या बाजूने तथ्यांची मांडणी करून वातावरण तापवले आहे. उल्हासनगरसारख्या सिंधीबहुल शहरात दोन्ही पक्ष आपली राजकीय पकड मजबूत करण्यासाठी हा प्रकल्प 'मोठा ट्रम्प कार्ड' ठरू शकतो, हे दोन्ही बाजूंना चांगलेच ठाऊक आहे.

खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचा दावा आहे की राज्य सरकार, केंद्र सरकार आणि मनपा पातळीवर स्वतःच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे हा प्रकल्प मार्गी लागला. तर भाजपचे आमदार कुमार आयलानी आणि जिल्हाध्यक्ष राजेश वाधरिया यांचे म्हणणे आहे की, हा प्रकल्प पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस त्यांच्याकडे आम्ही केलेल्या सततच्या प्रयत्नांचे आणि दिल्ली-मुंबईतील राजकीय संपर्काचे फलित आहे.

## निवडणुकीच्या तोंडावर बदलापूरमध्ये 'बॅनर वॉर'

### शहरातील विविध ठिकाणी प्रतिस्पर्धी उमेदवारांच्या बॅनरचे विद्रूपीकरण

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर, ता. २५ (बातमीदार) :** बदलापूर नगर परिषद निवडणुकीचा प्रचार जसजसा अंतिम टप्प्यात पोहोचत आहे, तसतशी त्याची धग दिवसेंदिवस वाढताना दिसत आहे. एका बाजूला सर्वच पक्षांचे उमेदवार बॅनरबाजी, चौकसभा आणि आश्वासनांच्या माध्यमातून मतदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न करत असताना, दुसरीकडे राजकीय वैमनस्य व्यक्त करण्याची पद्धत शहरात डोके वर काढत आहे.

शहरातील विविध ठिकाणी लावलेले राजकीय बॅनर फाडणे, विरोधी उमेदवारांचे चेहरे विद्रूप करणे आणि एकमेकांचे पोस्टर्स काढून फेकून देणे, अशा प्रकारांनी अचानक जोर धरला आहे. प्रचारात एका बाजूला सभांमधून आरोप-प्रत्यारोप, जुनी प्रकरणे बाहेर काढून टीका करणे सुरू आहे, तर दुसऱ्या बाजूला रस्त्यावर हे 'बॅनर युद्ध' तीव्र झाल्याचे दिसत आहे. उमेदवार आणि कार्यकर्त्यांमध्ये दडपलेला राग आणि द्वेष अशा पद्धतीने उफाळून येत असल्याचे मत स्थानिक नागरिक व्यक्त करीत आहेत.

### तणावाचे वातावरण

**निवडणुकांचा कार्यक्रम अंतिम टप्प्यात पोहोचत असताना या वाढलेल्या 'बॅनरफाड मोहिमे' मुळे शहरात तणावाचे वातावरण तयार झाले आहे. राजकीय वातावरण चुरशीला पोहोचले असताना, या वैमनस्यातून निवडणुका जवळ येत असताना काही अनुचित घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नाही, अशी भीती नागरिक व्यक्त करीत आहेत.**

## विषारी क्लोरिनची गळती

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

वसईमध्ये एक खळबळजनक घटना घडली आहे. येथील दिवानमाण परिसरात एक क्लोरिनचा सिलिंडर लीक झाला. यामुळे हवेत विषारी वायू पसरल्याने एकाचा मृत्यू झाला आणि ११ जणांची प्रकृती बिघडल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे वृत्त आहे.

**एकाचा मृत्यू, ११ जण रुग्णालयात**

प्राप्त माहितीनुसार, आज (मंगळवार) दुपारी वसई पश्चिम मधील दिवानमाण परिसरात अचानकपणे हवेत हिरव्या रंगाचा वायू परसला. यामुळे लोकांना श्वसनाचा त्रास जाणवू लागला, एवढंच नाहीतर काहींना मळमळ, उलट्या देखील होवू लागल्या. तर काहींच्या डोळ्यात जळजळ सुरू झाली, काहींना दम लागायला लागला. अचानकपणे असा त्रास का होवू लागला हे लवकर लक्षात आले नाही, मात्र नंतर जेव्हा लोकांना त्या वायूबाबत समजले तेव्हा लोकांनी त्या परिसरातून बाहेर जाण्यास



सुरुवात केली. मात्र तोपर्यंत या विषारी वायूमुळे एका व्यक्तीचा मृत्यू झाला होता. याशिवाय अन्य अकरा जणांना प्रचंड त्रास होवू लागल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात हलवण्यात आले, तेथे त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, या घटनेबाबत माहिती मिळताच अग्निशमन दलाची गाडी आणि आपत्ती व्यवस्थानप विभागाचे कर्मचारी घटनास्थळी पोहचले. यानंतर हा हा वायू आटोक्यात आणण्यासाठी प्रयत्न सुरू झाले. तोपर्यंत नागरिकांना परिसरातून बाहेरच थांबवण्यात आले होते.








# गोराईच्या विकासासाठी आंतरराष्ट्रीय विकासकांचा सहभाग

## -पर्यटन मंत्री शंभुराज देसाई

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** गोराई येथील महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या सुमारे 128 एकर जमिनीचा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटन स्थळाप्रमाणे विकास केला जाणार असून, याबाबतचा आढावा पर्यटन, खनिकर्म तथा माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई यांनी घेतला. यासंदर्भातील सर्व प्रलंबित कामे वेगाने मार्गी लावण्याचे निर्देश पर्यटन मंत्री शंभूराज देसाई यांनी यावेळी दिले. मेघदूत या निवासस्थानी गोराई प्रकल्पाबाबतचा आढावा घेताना पर्यटनमंत्री शंभूराज देसाई बोलत होते. या बैठकीला पर्यटन विभागाचे प्रधान सचिव संजय खंदारे, पर्यटन विभागाचे संचालक डॉ.बी.एन.पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक निलेश गटणे, उपसचिव विजय पोवार आणि इतर अधिकारी उपस्थित होते. मंत्री देसाई म्हणाले की, गोराई येथील जागेचा विकास करताना तिथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे मनोरंजन पार्क, वॉटर स्पोर्ट्स, रिसॉर्ट तसेच आकर्षक उद्यान आदी पर्यटकांना आकर्षित करतील अशा सर्वच सुविधा विकसित केल्या जाणार आहेत.त्यासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवरील विकासकांना सहभागी करुन घेण्याचे निर्देश मंत्री देसाई यांनी दिले. पीपीपी तत्वावर हा प्रकल्प राबविला जावा.शासनाकडून सर्व परवानग्या घेवून हा प्रकल्प अत्यंत आकर्षक असा व्हावा यासाठी पर्यटन विभागाने लक्ष द्यावे असेही ते म्हणाले.मंत्री देसाई म्हणाले की, गोवा,केरळ मध्यप्रदेश येथील पर्यटन प्रकल्पांचाही अभ्यास केला जावा.आंतरराज्य अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील पर्यटन तज्ज्ञ नेमून हा प्रकल्प बनविण्यात यावा. या प्रकल्पाबाबत काम करताना प्रकल्पाशी संबंधित शासनाच्या हक्क आणि अधिकारांशी तडजोड न करण्याच्या सूचना मंत्री देसाई यांनी यावेळी केल्या.

# निरंकारी बाल संत समागमांचे आयोजन

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** मुलांच्या मानसिक, भावनिक व आध्यात्मिक विकासासाठी त्यांना संतांच्या संगतीशी जोडण्याच्या निरंकारी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या दिव्य मार्गदर्शनास अनुसरुन रविवारी कळवा ठाणे व बेलापुर नवी मुंबई येथे क्षेत्रस्तरिय निरंकारी बाल संत समागमांचे आयोजन करण्यात आले. या व्यतिरिक्त मुंबईतील चेंबूर, वडाळा व गोरेगांव येथेही याच दिवशी क्षेत्रस्तरिय बाल संत समागमांचे आयोजन करण्यात आले.




"मुलांना देवाघरची फुले असे म्हटले जाते. अशा या बालकांना बालपणापासूनच ब्रह्मज्ञानी संतांचे सान्निध्य लाभले तर त्यांच्यामध्ये स्वाभाविकपणेच दिव्य गुणांचा विकास होतो आणि भविष्य उज्वल होण्याबरोबरच ते एक श्रेष्ठ मनुष्य म्हणून सुंदर समाज निर्मितीचे अंग बनून जातात." संत निरंकारी सत्संग भवन, कळवा येथे आयोजित बाल संत समागमामध्ये दिल्लीहून आलेल्या निरंकारी प्रचारिका कमलदीप कौर यांनी मुख्य मंचावरुन हे उद्गार काढले. या बाल समागमामध्ये संपूर्ण ठाणे शहरासह कळवा, मुंब्रा व दिवा येथील निरंकारी बालक व त्यांचे पालक मिळून सुमारे 2500 भक्तगणांनी भाग घेतला.

### संतांच्या संगतीने मुलांमध्ये येतात दिव्य गुण

**– निरंकारी प्रचारिका कमलदीप कौर**

या बाल संत समागमामध्ये विविध ठिकाणाहून आलेल्या बालकांनी निरंकारी मिशनच्या शिकवणूकीवर आधारित आपले विचार, भक्तीगीते व कवितांच्या माध्यमातून हिंदी, मराठी, इंग्रजी, भोजपुरी व गुजराती इत्यादि भाषांमधून आपल्या भावना व्यक्त केल्या ज्याची उपस्थित श्रोत्यांनी भरपूर प्रशंसा केली.

तर "सतगुरुंच्या दिव्य शिकवणूकीने मनुष्याच्या जीवनात सहजता, सजगता व एकरसता येते. अशी शिकवण जर बालपणपासून लाभली तर जीवनाचा पाया भक्कम होतो." असे विचार झुंझूनू (राजस्थान) येथून आलेल्या निरंकारी प्रचारिका निहारिका कटारिया यांनी नवी मुंबई महानगरपालिका स्कूल नं.4, सीबीडी-बेलापुर येथे आयोजित निरंकारी बाल संत समागम मध्ये मुख्य मंचावरुन प्रवचन करताना व्यक्त केले. या बाल समागमात संपूर्ण नवी मुंबई, पनवेल व उरण येथील निरंकारी बालक व त्यांच्या माता-पित्यांनी मिळून सुमारे 2000 भक्तगणांनी भाग घेतला.

# बीएसएनएलच्या केबलची चोरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** एमआयडीसी निवासीमध्ये काही जुन्या वापरात नसलेल्या टेलिफोन, खासगी नेट कंपन्यांच्या भूमिगत केबल चोरीला जात असल्याची माहिती भारत संचार निगम लिमिटेडचा अधिकाऱ्यांना देण्यात आल्याची माहिती रहिवासी राजू नलावडे यांनी दिली. रविवारी रात्री साडेनऊच्या सुमारास साईश्रृष्टी सोसायटीसमोरील बाजूस खोदलेल्या गटारातून तीन संशयित व्यक्ति केबल कापून त्या गोणीत भरीत असल्याचे जागरूक नागरिक राजेश कोलापाटे यांच्या पाहण्यास आल्यावर त्यांना हटकले असता ते पळून जाऊ लागले.त्यातील एका संशयिताचा गोणीत केबल घेऊन जात असल्याचा फोटो मोबाइलमध्ये काढला असून, ही माहिती त्यांनी सामाजिक कार्यकर्ते नलावडे यांना दिली. त्यांनी ती माहिती बीएसएनएल अधिकाऱ्यांना पाठवून या घटनेची चौकशी करण्यास सांगितले. एमआयडीसीमध्ये नवीन काँक्रिट रस्ते, गटारे, नाले, सांडपाणी वाहिन्या यांची कामे करीत असताना काही केबल नादुरुस्त झाल्या होत्या, या जुन्या केबल तशाच राहिल्याने त्या चोरीला जाण्याचे प्रकार वाढले आहेत. या केबलला भंगारात चांगला भाव मिळत असल्याने त्या चोरीस जात आहेत.

# समुपदेशन केंद्र ही काळाची गरज

## – केडीएमसी आयुक्त अभिनव गोयल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**कल्याण :** समुपदेशन केंद्र ही काळाची गरज आहे असे प्रतिपादन कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल यांनी आज केले, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण विभागाच्या वतीने आणि वुमन्स वेल्फेअर फाउंडेशन या एनजीओच्या मदतीने कल्याण पश्चिम येथील चिकणघर परिसरात उभारण्यात आलेल्या समुपदेशन केंद्राच्या शुभारंभ समयी बोलताना त्यांनी हे प्रतिपादन केले.



शहरातील दुर्बल घटकांसाठी महापालिकेमार्फत विविध योजना राबविल्या जातात. मुली, जेष्ठ नागरिक, महिला यांना घर, कार्यालय इ. ठिकाणी उद्भवणाऱ्या समस्या मांडण्यासाठी समुपदेशन केंद्राच्या माध्यमातून एक व्यासपीठ उपलब्ध होणार असल्याची माहिती आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी दिली. आरोग्यदायी आणि संतुलित सोसायटीसाठी समुपदेशन केंद्राची मदत होणार असून या समुपदेशन केंद्राचा लाभ जास्तीत जास्त नागरिकांनी घ्यावा असे आवाहन आयुक्तांनी यावेळी केले. त्याचप्रमाणे दहावी व बारावीच्या विद्यार्थ्यांसाठी तणाव मुक्ती शिबिरांचे आयोजनही करावे अशा सूचना आयुक्त अभिनव गोयल यांनी यावेळी संबंधितांना दिल्या.

सध्याच्या युगातील बदलत्या कौटुंबिक व्यवस्थेमुळे अनेक समस्या उद्भवतात त्यावेळी अशा समुपदेशन केंद्राची निकड लक्षात येते असे मत महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे यांनी यावेळी व्यक्त केले. कल्याण पश्चिम येथील चिकणघर परिसराव्यतिरिक्त मोहन खेडा-मोहने, सप्तगिरी- कल्याण पूर्व, पेंडसे नगर डोंबिवली- पूर्व आणि आनंद नगर -डोंबिवली पश्चिम या परिसरातही समुपदेशन केंद्र सुरू करण्यात येत असून महापालिका शाळां मधील विद्यार्थ्यांकरिता कल्याण साठी व डोंबिवली विभागासाठी प्रत्येकी एका समुपदेशकाची नेमणूक करण्यात आल्याची माहिती महिला व बालकल्याण विभागाच्या उपायुक्त कांचन गायकवाड यांनी यावेळी दिली.

या समुपदेशन केंद्रात एक समुपदेशक व आवश्यकतेनुसार लिगल अडवायझरचे सहकार्य नागरिकांसाठी उपलब्ध राहील अशी माहिती वुमन्स वेल्फेअर फाउंडेशनच्या अध्यक्षा मीनाक्षी उज्जैनकर यांनी या कार्यक्रमात दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रोजेक्ट डायरेक्टर आरती बनसोडे यांनी केले. यावेळी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, उपायुक्त कांचन गायकवाड, संजय जाधव, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.दीपा शुक्ला, वैद्यकीय अधिकारी डॉ. टिके, डॉ. पौर्णिमा ढाके, समाज विकास अधिकारी प्रशांत गवाणकर, कल्याण मधील जेष्ठ नागरिक समन्वय समितीचे अध्यक्ष कोसूळकर, इतर मान्यवर तसेच नागरिक बहुसंख्येने उपस्थित होते.

# श्रमजीवी संघटना, कुंरूद ग्रामपंचायतीच्या अथक प्रयत्नाने १८० घरकुले मंजूर करण्यात यश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पडघा :** श्रमजीवी संघटना व ग्रामपंचायतीच्या अथक प्रयत्नाने भिवंडी तालुक्यातील कुंरूदमध्ये १८० लाभार्थ्यांना घरकुल मंजूर करण्यात यश आल्याने लाभार्थ्यांच्यात आनंदाचे वातावरण आहे.




सुरुवातीच्या काळात कुंरूद गृप ग्रामपंचायतीच्या हद्दीतील आदीवासी नागरीकांना घरकूल मंजुर झाले होते.मात्र नंतर ग्रामपंचायत हद्दीतील कुरुंद, वाफाळे, दळेपाडा, वाहुली येथील घरकुल लाभार्थ्यांची संख्या जास्त असल्याचे श्रमजीवी संघटनेच्या कार्यकर्त्यांच्या लक्षात आल्यानंतर श्रमजीवी संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक सापटे,तालुकाध्यक्ष सुनील लोणे,महीला संघटक स्वाती शिंदे, व स्थानिक कार्यकर्ते दिनेश भोईर, तारामती संवर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामपंचायत हद्दीतील घरकुल लाभार्थ्यांचा पुःनसर्वेक्षण करण्याची मागणी ग्रामपंचायतीकडे लाऊन धरण्यात आली होती. त्यानुसार ग्रामपंचायतीने सर्वेक्षण करुन चारही गावातील सर्व लाभार्थ्यांना प्रधानमंत्री जन मन व ग्रामीण केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत कुरुंद ग्रामपंचायत कमीटी व प्रशासनाने अथक मेहनत घेऊन सर्व आदीवासी लाभार्थ्यांना १८० घरकुले मंजूर करून दिली. त्यातील ८० घरकुलांचे बांधकाम पुर्ण करून सरपंच दीपाली केदार, उपसरपंच निकीता जाधव ग्रामपंचायत सदस्य योगेश (बंटी) पाटील, श्रीकांत गायकर, भाई पाटील, संदीप काठोळे, जान्हवी पाटील, विशाखा भोईर, भावना सांबरे, रेश्मा वाघे, ग्रामपंचायत अधीकारी नितीन देशमुख सामाजिक कार्यकर्ते विलास पाटील, जगदीश पाटील, दिलीप केदार, मुकेश जाधव विनोद पाटील, निकेश विशे यांच्या उपस्थितीत घरकुल लाभार्थ्यांचा गृहप्रवेश व चावी वाटपाचा कार्यक्रम नुकताच घेण्यात आला. तर कूरुंद येथे श्रमजीवी संघटना व ग्रामपंचायत कमीटी, प्रशासनाच्या अथक प्रयत्नाने सर्व लाभार्थ्यांना घरकुल मंजूर झाल्याबद्दल दोघांचेही सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

# अंतर्मनातील अनैतिक प्रवृत्तींना आळा घालणारं एक ते चार बंद



**महाराष्ट्र शासन सांस्कृतिक कार्य विभाग आयोजित ६४ वी राज्य हौशी मराठी नाट्य स्पर्धा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या आचार्य अत्रे रंगमंदिर या केंद्रावर सुरू असून या स्पर्धेत अत्यंत उत्कृष्ट आणि दर्जेदार नाटकांची मेजवानी नाट्यरसिकांना अनुभवायला मिळत आहे. या चढाओढीच्या स्पर्धेत दि.२४ नोव्हेंबर रोजी सादर झालेलं '१ ते ४ बंद' या नाटकानं प्रेक्षकांचं मन जिंकत आपल वेगळेपण सिद्ध केलं आहे.**

पुणं म्हटलं की पुण्याची संस्कृती, तिथली भाषाशैली, पुणेरी पाट्या, शिस्त डोळ्यासमोर येते. अशाच या पुण्याच्या संस्कृतीचा ओलावा जपणारं हे नाटक ! नावातच पुणेरी हटकेपणाची ढब दिसते.

भाषेची स्पष्टता, साधं सरळ आणि संस्कारी तसेच विचारांवरील चांगल्या व्यक्तिमत्त्वांचा पगडा असे गुणविशेष असणारे व्यक्तिमत्व तसेच पत्नी सुमती आणि मुलगी शाल्मली असा सांसारिक आयुष्यात व्यस्त असणारे चिंतामणी साने हे व्यक्तिमत्व सुशिल शिरोडकर यांनी
उत्तम प्रकारे साकारले आहे. याशिवाय दुरुस्तीची गरज असलेलं पुण्यातील जुनं मिठाईचं दुकान व त्यासाठी अनुकूल असे वातावरणनिर्मिती नेपथ्यकारांनी अगदी सूक्ष्म विचारशैलीने दर्शवली आहे.नाटकाची सुरुवात मिठाईच्या दुकानात होते. रूपाली तावरे यांनी निशा या मुख्य नायिकेच पात्र साकारल आहे.स्कार्फ बांधून नायिका आत येते तेव्हा दुकानात आलेली अनोळखी व्यक्ती समजून बोलताना नायकाची पुणेरी संवादशैली दिसून येते. चिंतू म्हणत नको ती मागणी करणाऱ्या निशाला अभय म्हणजे तिच्या नवऱ्याच्या मित्र असलेले चिंतामणी साने वेगवेगळी युक्ती करून तिचं मन वळवत असतात. नायिका जबरदस्ती काही गोष्टींची मागणी करत असताना तिला डावलण्यासाठी अभय आणि तू मिळून सत्यनारायणाची पूजा घाला अशा त्याच्या वाक्याने शिवाय त्यावर तिचं त्याला 'अबला पुरुष आहेस' असे म्हणणे प्रेक्षकांमध्ये हशा पिकवतो.

पहिला प्रसंगात ड्रिम स्पामध्ये काम करणारी बोल्ड लुकची शलाखा ढोबळकर. तिची इटालियन शैलीची आहार पद्धती आणि सानेंचा आवडता तूप भात हे दोन्ही विषम खाद्यपदार्थ 'आहार तसा विचार' अस म्हणतात त्याचप्रमाणे शलाका आणि सानेंमधील वैषम्य दर्शवत होता.

दुसऱ्या प्रसंगातील बिनधास्त मीरा श्रीधर आणि तिची 'अमेरिकानो एक्स्प्रेसो' ही पाठ करून मागवण्यात लागलेली कॉफी तसेच खोटं असल तरी बेभान वागणाऱ्या मीरापासून सुटका करण्यासाठी - लता ताईंचं गाणं लावुया का? आमच्या दुकानातली मिठाई टिळकांनी ही चाखलीये तू चाखून बघ : असा सानेंचा युक्तिवाद त्यांच सोज्वळ स्वभावगुण दर्शवते.







**दोन अंकी नाटक**

**"१ ते ४ बंद"**

लेखन : युगंधर देशपांडे
दिग्दर्शन व नेपथ्य : माणिक शिंदे
नेपथ्य निर्माण व डिझाईन : रितेश ढोमसे
प्रकाश योजना : ऋशीकेश वायदंडे
संगीत : प्रतिश खंडागळे
रंगभूषा : गौरी
वेशभूषा : निता शिरोडकर
नृत्य : मनिष पाठक
सुत्रधार : अमोल कुलकर्णी, प्रकाश टाकळकर

**भूमिका व कलाकार**

चिंतामणी साणे : सुशिल शिरोडकर
निशा : रूपाली तावरे
शलाखा : तारा रकिबे
मिरा : स्वप्नाली जळगांवकर

आपण कुठल्या पातळीचे चावट आहोत हे निशाला पटवून देण्यासाठी फ्लॅशबॅकच्या प्रयोगातून सानेंचा केविलवाणा प्रयत्न दिसून आला. फ्लॅशबॅकचा प्रयोग अगदी रुपेरी पडद्याप्रमाणे जाणवतो.यात ऋषिकेश वायदंडे यांच कौशल्य सुरेख होतं. प्रतीश खंडागळेंच्या स्पासेंटर , कॅफे मधील पार्श्व संगीताने उत्कृष्ट वातावरण निर्मिती केली.

नायिका दुकानात आल्यावर भाऊजी अशी साद घालते. नैतिक अनैतिक मागण्यांची वळणं घेत हा प्रवास भाऊजी वरून चिंतू,चिंत्या उत्तरार्धात पुन्हा भाऊजी वर कसा येतो याची अनुभूती घेण्यासाठी प्रेक्षकांनी हे नाटक जरूर पहावे. मागून ओरबाडून किंवा गयावया करून काहीही मिळत नाही. एक्सेप्टनससारखं दुसरं सुख नाही असा संदेश लेखक - युगंधर देशपांडे तसेच दिग्दर्शक - माणिक शिंदे यांनी दिला आहे.सानेंच्या व्यक्तिमत्वाला साजेशी साधी वेशभूषा, तसेच शलाखा व मीराचा बिनधास्त आणि बोल्ड लूकसाठी वेशभूषाकार - नीता शिरोडकर यांची अनुरूप वेशभूषा होती.

एक ते चार या वेळेत नायक काहीही करू शकला असता. सार्वजनिक ठिकाणी एसटी , रिक्षा, ट्रेन अशा गर्दीच्या ठिकाणी लोकं संधी शोधत असतात. एखाद्या तथाकथित माणसाला अशी संधी मिळाली असती तर कदाचित ती त्याने सोडली नसती.असं असताना एक ते चार ही वेळ हातात असून शिवाय समोरून ,संधी चालून आलेली असताना नायकाचा संयम प्रेक्षकांना नेहमीच आत्मचिंतन करण्यास भाग पाडेल.


साने त्यांच्या फसलेल्या दोन्ही प्रयत्नांतून रोजची जीवनशैलीच चांगली तसेच संधिवात असला तरी बायकोचं हसू बघायला आवडत. अस समजावताना नकळत स्वतःच मोकळे स्वच्छंदी बोलतात आणि त्यांच्या व्यक्त होण्यातून लेखिकेला झालेलं 'रिअलायझेशन' अफलातून होतं.

नाटकात गण्याचा वारंवार उल्लेख होत होता. परंतु तो कुठेही दिसला नाही. तो दिसला असता तर काय झाले असते. अशी कुतूहलता प्रेक्षकांना वाटली असेल.

हल्ली वाढत चाललेला व्याभिचार पाहता सानेंसारख मनावर अंकुश ठेवणारं व्यक्तिमत्व असणं खूप दुर्मिळचं. एक ते चार बंद; या पुणेरी पाटीतून "बंद म्हणजे बंद" ही जी तटस्थता आहे हि नायकाने त्याच्यातला चावटपणा आणि तत्सम दुर्गुणांना घातलेलं वेसणच आहे. अस म्हणण्यास हरकत नाही. यामुळे नाटकाला दिलेलं "एक ते चार बंद हे" शीर्षक हे अतिशय समर्पक आहे हे लक्षात येतं.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
https://www.facebook.com/jeevandeepnews/
https://www.instagram.com/thane_jeevandeep/
https://x.com/Jeevandeepvarta
https://jeevandeepvarta.com/

# भविष्यवेध



बुधवार २६ नोव्हेंबर २०२५

**मेष**
ताजेतवाने वाटू शकते. यश हातातोंडाशी येण्याची शक्यता वाटताना आपली ताकद कमी होत जाण्याची भावना निर्माण होईल. निराशाजनक आर्थिक परिस्थितीमुळे काही महत्त्वाच्या कामामध्ये खंड पडू शकतो.

**वृषभ**
दिवस उत्तम जाईल. आपल्या मित्रांना रात्रीचे जेवण आणि नृत्यासाठी बाहेर घेऊन जाण्यापूर्वी विचार करा. कार्यात यश मिळविण्यासाठी आपले मत ठामपणे मांडा. मित्रांच्या सहाय्याने अनुकूलता वाढेल.

**मिथुन**
व्यापार व प्रणयाच्या क्षेत्रात यश मिळेल. प्रिय व्यक्तीबरोबर संवाद होईल. आवश्यक कार्य देखील पूर्ण होतील. मित्रांचा अनुकूल सहयोग मिळेल. आपल्या आपल्या नातलगांची व मित्रांची चांगली भेट होईल.

**कर्क**
जे लोक बऱ्याच दिवसापासून खूप व्यस्त होते त्यांना आज स्वतःसाठी वेळ मिळू शकतो. वादविवाद किंवा कार्यालयातील राजकारण, तुम्ही या सगळयाला पुरून उराल. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**सिंह**
लाभ प्राप्तिचा योग. व्यापारातील आर्थिक त्रासाला संयमाने सोडवच्याचा प्रयत्न करा. निवेश प्रत्याशित.आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये.

**कन्या**
घरगुती कामं बराच काळ व्यस्त ठेवतील. धार्मिक आणि अध्यात्मिक हेतू पूर्ण करण्यासाठी आजचा दिवस चांगला आहे. अनियोजित माध्यमातून मिळणारे पैसे तुमचा दिवस उजळून टाकतील.

**तुळ**
जीवनात ध्येयावर लक्ष द्या पूर्ण विश्वासाने त्याच्या प्राप्तीचा प्रयत्न करा.व्यापारात कार्यक्षेत्राचा विकास, व्यापारिक बाधा येऊ शकतात. आय पेक्षा व्यय अधिक असल्याने आर्थिक तंगीची आशंका.

**वृश्चिक**
आपल्या व्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. आजचा दिवस व्यापार क्षेत्रातील चांगली बातमी आणणारा आहे. जुनी कामे झाल्यामुळे उत्साह आणि प्रसन्नता वाटेल.

**धनु**
व्यापार-व्यवसाय सहज राहील. कौटुंबिक सभासदांचा सहयोग मिळेल. यात्रा घडू शकते. अडकलेला पैसा मिळाल्याने आनंद वाटेल. कौटुंबिक चिंता दूर होईल. व्यावसायिक स्थिति चांगली राहील.

**मकर**
बळात वाढ होईल. आरोग्य उत्तम राहील. महत्त्वाच्या कामांसाठी श्रम करावे लागेल. आर्थिक विषयांमध्ये सावगिरी बाळगा. सुख-शांतीचे वातावरण राहील. हसत खेळत वेळ खर्च होईल.

**कुंभ**
आपल्या कार्याच्या दरम्यान आपल्या कौटुंबिक ताणांचे स्मरण करून त्यांना कार्यात मिसळू नये. आपल्या ्यावसायिक योजनेबद्दल होकारात्मक दृष्टीकोण प्रदर्शित करा. महत्वपूर्ण कार्यांवर व्यय होईल.

**मिन**
तटस्थ भूमिका घेणे, प्रगतिवर्धक बातम्या मिळतील. मुलांची उन्नति प्रसन्नता देईल. आधी केलेल्या कामाचे फळ मिळेल. बिघडलेले संबंध सुधारतील.नवीन जोखिम असलेली कार्ये टाळा.

### रुग्णवाहीका चालकाने अर्ध्यावरच सोडले

# प्रसुत मातेची नवजात बाळाला घेऊन जंगलातून पायपीट !



■ दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**राज्य सरकार गर्भवती महिला बालसंगोपनाच्या कितीही योजना राबवत असलं तरी राज्यातील आरोग्य यंत्रणेच्या असंवेदनशील कारभार अनेकदा समोर येतो. याचंचं आणखी एक पालघर जिल्ह्याच्या मोखाडा तालुक्यातील ताज आणि संतापजनक उदाहरण समोर आलं आहे. मोखाडा तालुक्यात एका प्रसूत महिलेला रुग्णवाहिका चालक गावाच्या दोन किलोमीटर मागेच अर्ध्या रस्त्यात सोडून गेल्याची संतापजनक घटना समोर आली आहे. रुग्णवाहिका चालकाच्या या मुजोरपणामुळे या प्रसूत महिलेला अवघ्या दोन दिवसाच्या बाळाला हातात घेऊन घनदाट जंगलातून दोन किलोमीटर पायपीट करावी लागली आहे.**

मिळालेल्या माहितीनुसार, मोखाडा तालुक्यातील आमला गावाचे माहेर असलेल्या सविता बांबरे या महिलेला 19 नोव्हेंबर ला प्रसूतसाठी मोखाडा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आलं होतं. त्यानंतर सुखरूप प्रसूतीसाठी त्यांना जव्हारच्या ऊपजिल्हा रुग्णालयात पाठवलं. तिथे त्यांची प्रसूती सुखरूप झाली.

त्यानंतर रविवार 23 नोव्हेंबरला त्यांना रुग्णवाहिका देऊन घरी पाठविण्यात आलं. मात्र, रुग्णवाहिका चालकाने त्यांना गावापासून दोन किलोमीटर लांब रस्त्यावर उतरवलं आणि तो निघून गेला. त्यामुळे सविता यांना ताणसा अभयारण्यातील आमला गावात पोहोचण्यासाठी दोन किलोमीटर चालत जावं लागलं.

अवघ्या दोन दिवसांच्या बाळाला घेऊन प्रसूत सविता बारात त्यांच्या आई आणि सासूबाईसोबत चालत जात असतानाचा व्हिडीओ व्हायरल झाल्याने, आरोग्य यंत्रणेचा गचाळ कारभार चव्हाट्यावर आला आहे. त्यानंतर आरोग्य यंत्रणेवर चहूबाजूंनी टीका केली जात आहे.

हा व्हायरल व्हिडीओ आमल्यातील राजु सोमा बारात या नागरिकाने सोशल मीडियावर शेअर केला. त्यामुळे ही घटना उघडकीस आली. त्यानंतर मोखाडामध्ये एकच खळबळ उडाली असून आदिवासी माणसांनी असेच जगायचे आणि मरायचे का? असा संतप्त सवाल नागरिकांकडून केला जात आहे.

दरम्यान, सविता बांबरे यांनी जव्हारहुन केवनाळे येथे जाण्यासाठी 102 क्रमांकाची रुग्णवाहीका बुक केली होती. मात्र, त्यांनी सुर्यमाळ येथे आल्यानंतर आमले येथे जाण्याचा चालकाकडे आग्रह धरला. मात्र, चालकाने त्यांना आमला गावाच्या फाट्याजवळ नेले, त्यानंतर चालकाला आम्ही येथुन पायी घरी जाऊ, असं सांगितल्याचं रुग्णवाहीका चालकाने वैद्यकीय अधिकाऱ्यांना स्पष्टीकरण दिलं आहे. याबाबतची माहिती तालुका वैद्यकीय अधिकारी भाऊसाहेब चत्तर यांनी दिली.

# डोंबिवली पश्चिमेतील साडेचार हजार मतं दुसऱ्या पॅनलमध्ये टाकली - विकास म्हात्रे यांचा आरोप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली : ठाकरे बंधू यांनी मतदार यादीतील घोळा वरून आवाज उठवला असताना आता भाजपा आणि शिवसेना शिंदे गटाकडून देखील याविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. डोंबिवली पश्चिमेतील राजू नगर आणि गरीबाचा वाडा येथील सुमारे साडेचार हजार मतं दुसऱ्या पॅनलमध्ये टाकण्यात आल्याचा आरोप भाजपातून शिंदे गटात प्रवेश केलेले विकास म्हात्रे यांनी केला आहे. "मतदार यादीतील घोळाकडे निवडणूक अधिकाऱ्यांनी दुर्लक्ष केले, तर त्यापाठी असलेल्या अदृश्य शक्ती बाहेर काढाव्या लागतील," असा कठोर इशारा म्हात्रे यांनी दिला.**



अंबरनाथ येथील मतदार यादीतील घोळावरून भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी संताप व्यक्त केला आहे. यानंतर लगेचच डोंबिवलीत निवडणुकीत मतदार यादीतील झालेल्या मोठ्या गोंधळावरून माजी नगरसेवक व पॅनल क्र. 22 मधील इच्छुक उमेदवार विकास म्हात्रे यांनी निवडणूक अधिकाऱ्यांवर थेट प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहेत.

म्हात्रे यांनी आरोप केला की पॅनल क्रमांक 22 मधील तब्बल साडे चार हजार मते पॅनल 21 आणि 25 मध्ये ढकलण्यात आली आहेत. "बॉर्डरवरील काही मते दुसऱ्या पॅनलमध्ये गेली, तर ते समजू शकते. पण 22 पॅनलच्या अगदी मध्यभागातील मतदारांची नावे इतर पॅनल मध्ये हलवण्यात आली आहेत. यामुळे ते मतदार हे मतदानापासून वंचित राहण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही बाब गंभीर असून संशय निर्माण करणारी आहे," असे ते म्हणाले.

राजू नगर आणि गरीबाचा फाटा या भागातील सुमारे 4,500 मतांची अदलाबदल झाल्याचा दावा करत म्हात्रे म्हणाले, "यासंबंधी आम्ही अधिकृतरीत्या हरकत नोंदवली आहे. निवडणूक आयोगाने या तक्रारीची दखल घेणे अत्यावश्यक आहे, अन्यथा जनतेचा विश्वास ढळेल." त्यांनी डिजिटल मतदार यादीतील त्रुटींवरही जोरदार टीका केली." ऑनलाइन डिजिटल यादी अर्धवट लावण्यात आले आहे. या याद्यांमध्ये दुसऱ्या भागातील मतदारांचे नावे मनमानी पद्धतीने घुसवण्यात आली आहेत. यामुळे मतदारांच्या अधिकारांवर गदा येत आहे," असा आरोप त्यांनी केला.

## 'ऑपरेशन ऑल आऊट' मुळे उल्हासनगरातील गुन्हेगारीला चाप

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**उल्हासनगर :** उल्हासनगरात मध्यरात्री गुन्हेगारीला चाप लावण्यासाठी पोलिसांनी पुन्हा एकदा 'ऑपरेशन ऑल आऊट'ची धडाकेबाज अंमलबजावणी केली. २२ ते २३ नोव्हेंबरच्या मध्यरात्री दोन तास चाललेल्या या व्यापक कोम्बिंग ऑपरेशनमध्ये प्रभाग-४ परिसराला पोलिसांनी घेरला होता.

पोलिस उपायुक्त सचिन गोरे, सहाय्यक पोलिस आयुक्त अमोल कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली तब्बल २२५ अधिकारी, कर्मचारी रस्त्यावर उतरले होते. गुन्हेगारी, नशा, तंबाखू, गुटखा, जुगार अशा विविध अनियमिततेवर मोठी कारवाई केली. शहरातील कायदा-सुव्यवस्थेवर मजबूत पकड ठेवण्यासाठी उल्हासनगर पोलिसांनी २२ नोव्हेंबरच्या रात्री १० ते १२ या वेळेत झोन-४ परिसरात 'ऑपरेशन ऑल आऊट' राबवले.

गुन्हेगारांची हालचाल रोखणे, अड्डयांवर धडक कारवाई करणे आणि नागरिकांना सुरक्षितता प्रदान करणे हा या मोहिमेचा हेतू होता. विभागीय सहाय्यक आयुक्त यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण कोम्बिंग ऑपरेशन पार पडले.

यात ४१ अधिकारी, १८४ अमलदार अशा एकूण २२५ कर्मचाऱ्यांनी विविध ठिकाणी धडक कारवाई केली. उल्हासनगर पोलिसांच्या कडक आणि नियोजनबद्ध कारवाईमुळे शहरात सुरक्षा व सुरक्षिततेची भावना अधिक बळकट झाली आहे. गुन्हेगारी विरोधातील हा दमदार उपक्रम भविष्यातही सातत्याने राबवण्याचा निर्धार पोलिसांकडून व्यक्त करण्यात येत आहे.

## खा. नरेश म्हस्केंचा ठाणे मनपा जिंकण्यासाठी 'अब की बार - सौ पार'चा नारा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** शहरात शिवसेना (शिंदे गट) आणि भाजप यांच्यात विविध मुद्द्यांवरून संघर्ष तीव्र होत असताना, शिंदे गटाचे खासदार नरेश म्हस्के यांनी पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाचा नारा दिला आहे. त्यांनी आनंद आश्रम येथे शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक घेत महायुतीच्या विजयासाठी एकदिलाने काम करण्याचा आणि ठाणे महापालिकेत १०० पेक्षा अधिक नगरसेवक निवडून आणण्याचा निर्धार व्यक्त केला. काही दिवसांपूर्वी बीएसयूपी योजनेतील सदनिकाधारकांना मुद्रांक शुल्कात सवलत देण्याच्या निर्णयाचे श्रेय घेण्यावरून शिंदे सेना आणि भाजपच्या स्थानिक नेत्यांमध्ये वाद झाला होता. या वादातून ठाणे पालिका निवडणुकीत युती होणार की नाही, याबद्दल साशंकता व्यक्त केली जात होती.



**निवडणुकीच्या तोंडावर सत्ताधारी पक्षातील शिवसेना आणि भाजपच्या स्थानिक नेत्यांमध्ये शीतयुद्ध सुरू असून, प्रभागातील वाद पोलिस ठाण्यापर्यंत पोहोचला होता. या राजकीय तणावाच्या पार्श्वभूमीवर खासदार नरेश म्हस्के यांनी पालिका निवडणुकीसाठी शिवसेना पदाधिकाऱ्यांची बैठक घेऊन रणशिंग फुंकले. त्यांनी 'अब की बार सौ पार' असा नारा देत संपूर्ण शहरात महायुतीचे १०० पेक्षा अधिक नगरसेवक निवडून आणण्याचा निर्धार केला आहे.**

## पनवेल मनपाच्या मतदार याद्यांवर केवळ एकच हरकत ?

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**पनवेल, ता. २५ (बातमीदार)** : पनवेल महापालिकेने जाहीर केलेल्या प्रभागनिहाय मतदार याद्यांमध्ये प्रचंड तफावत आहे. एका प्रभागातील मतदारांचे नाव थेट दुसऱ्या प्रभागात स्थलांतरित केले आहे; मात्र असे असताना सोमवारी एकच हरकत आल्याने सामाजिक संघटनांकडून आक्षेप घेतला आहे.

खारघरमधील मतदान केंद्राचे क्षेत्र कळंबोलीत दाखल गेले आहे. तर नावडेतील शेकडो नागरिकांची नावे कामोठे प्रभागात नोंदवली गेली आहेत. या सर्व गोंधळात प्रभागनिहाय याद्यांसाठी हरकती व सूचना मागवण्यात आल्या असताना सोमवारपर्यंत फक्त एकच हरकत दाखल झाल्याची माहिती निवडणूक विभागाने दिली आहे. त्यामुळे याद्यांमधील चुका असताना अल्प हरकतीची संख्या चर्चेचा विषय बनला आहे.

**नाराजीचा सूर**

मतदार याद्यांतील विसंगतीवरून राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील यांच्या नेतृत्वातील शिष्टमंडळाने आयुक्त मंगेश चितळे यांची भेट घेतली. तर सत्ताधारी गटातील अनेक नगरसेवकांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्यामुळे पडद्याआड सुरू असलेल्या गोंधळावरून नाराजीचा सूर आहे.

### शरद पवार गटाच्या

## संविधान गौरव रॅली मुळे ठाण्यात वाहतुकीत बदल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**ठाणे :** संविधानास यंदा ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने बुधवारी सायंकाळी राष्ट्रवादी (शरद पवार गट) पक्षाच्या वतीने संविधान गौरव रॅली आणि सभेचे आयोजन केले जाणार आहे. त्यामुळे ठाणे वाहतुक पोलिसांनी कोर्टनाका परिसरात वाहतुक बदल लागू केले आहेत. या बदलामुळे वाहतुक कोंडी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

ठाणे रेल्वे स्थानक परिसर ते ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय अशी रॅली काढली जाणार असून त्यानंतर येथील संविधान प्रस्ताविकेच्या प्रतिकृतीनजीक रॅलीचा समारोप होणार आहे. या रॅलीत शरद पवार गटाचे नेते आमदार जितेंद्र आव्हाड आणि वकील असीम सरोदे उपस्थित असतील. तसेच येथे एका सभेचे आयोजन केले जाणार असल्याने ठाणे पोलिसांनी वाहतुक बदल लागू केले आहेत.

टेंभीनाका येथून हॉटेल पव्हेलियन, खाडी पूल नाका, कळवा, नवी मुंबई वाहतुक करणाऱ्या वाहनांना कोर्टनाका चौक परिसरात प्रवेशबंदी आहे. येथील वाहने पोलीस शाळा येथून किंवा कोर्टनाका येथून जीपीओ मार्गे वाहतुक करतील. हे वाहतुक बदल दुपारी २ ते रात्री १० वाजेपर्यंत लागू असतील.

## नवी मुंबई महापालिकेचा फेरीवाल्यांना दणका

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**नवी मुंबई, ता. २५ :** शहरातील रस्त्यांवर, पदपथांवर फेरीवाल्यांचे अतिक्रमण नवी मुंबई पालिकेच्या अतिक्रमणविरोधी पथकांनी हटवले. वाशी, कोपरखैरणे, घणसोली, ऐरोलीतील दुकानांसमोरील सामासिक जागेत बेकायदा दुकानांवर कारवाई केली.

नियोजनबद्ध अशा नवी मुंबई शहरात दुकानदारांकडून अतिक्रमण करताना व्यावसायिक वापर सुरू आहे. अनेक ठिकाणी पदपथांवरील अतिक्रमणाने पादचाऱ्यांना चालण्यासाठी अडचणी येत आहेत. त्यामुळे पालिकेच्या अतिक्रमण विभागाने कारवाईला सुरुवात केली. तुर्भे सेक्टर २० येथे अक्षर इन्फ्रास्ट्रक्चर्सवर कारवाई करण्यात आली आहे. बेलापूर सेक्टर १३ येथे मलनिस्सारण केंद्रालगतच्या १२ बेकायदा झोपड्या हटवण्यात आल्या. तसेच सीवूड्स येथील विठ्ठल मंदिराशेजारील २२ झोपड्यांवर कारवाई करण्यात आली. कोपरखैरणे येथे शिळफाटा मार्गालगत फेरीवाल्यांचे अतिक्रमण काढून मोकळे करण्यात आले. घणसोली विभागात दुकानदारांनी बेकायदा पद्धतीने फेरीवाल्यांनी संसार थाटले आहेत. कोपरखैरणे रेल्वे स्थानकांच्या परिसरात मोठ्या प्रमाणात फेरीवाले झाले आहेत. येथे महापालिकेने उड्डाणपुलाखाली तसेच पदपथावरील झोपड्यांवर कारवाई केली.

## भिवंडी : राहनाळ गावात आरोग्य शिबीर संपन्न

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी ( प्रतिनिधी)** भिवंडी तालुक्यातील राहनाळ गांव येथील स्व.गोपीनाथ भोईर सामाजिक संस्थे तर्फे भाजपा राहनाळ शाखेच्या सहकार्याने चरणीपाडा येथील प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात आरोग्य तपासणी व मोफत औषध वितरण शिबिराचे आयोजित करण्यात आले होते.स्थानिक ग्रामस्थ व महिला नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होत आरोग्य तपासणी करून घेतली. संस्थेचे संस्थापक माजी सरपंच राजेंद्र भोईर व ठाणे जिल्हा परिषद माजी सभापती सपना भोईर यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिराचे उद्घाटन भाजपा जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी व भाजपा युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष व जिल्हा परिषद सदस्य देवेश पाटील यांच्या हस्ते



**भाजपा जिल्हाध्यक्ष जितेंद्र डाकी व भाजपा युवा मोर्चा प्रदेश उपाध्यक्ष व जिल्हा परिषद सदस्य देवेश पाटील यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन**

या शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. प्रसंगी प्रभारी सरपंच प्रताप पाटील,नामदेव पाटील,राजेंद्र मढवी,माजी पंचायत समिती सभापती ललिता पाटील,माजी सरपंच ज्योत्स्ना मढवी,राजेंद्र भोईर ग्रामपंचायत सदस्य ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संजीवन हॉस्पिटल पुर्णा,गोपीरत्न हॉस्पिटल काल्हेर,स्पेक्ट्रम हॉस्पिटल अंजूरफाटा यांच्या सहकार्याने पार पडलेल्या या भव्य आरोग्य शिबिरात हृदयरोग, मधुमेह,स्त्रीरोग, सर्वसाधारण आजारावरील तज्ञ डॉक्टरांनी चरणीपाडा,आनंद नगर,लक्ष्मण नगर रेल्वे झोपडपट्टी परिसरातील सुमारे ३०० हुन अधिक स्त्री पुरुषांची आरोग्य तपासणी व औषधे सुद्धा वितरित करण्यात आली.या प्रसंगी राहनाळ गावातील १३ विविध वैद्यकीय पदवी घेतलेल्या डॉक्टरांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी देवेश भोईर, कैलास नाईक, पंकज पाटील,गणेश कांबळे,मंगेश उबाळे, किरण पवार,उमेश पवार, केविन गडा,विठ्ठल पिंगळे यांनी विशेष मेहनत घेतली.

## म्हसा विद्यालयात विद्यार्थी गुणगौरव सोहळा

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुरबाड** : दि.18 रोजी वीर हुतात्मा भाई कोतवाल विद्यालय व ज्युनिअर कॉलेज, म्हसा ता. मुरबाड या विद्यालयात येथिल माजी विद्यार्थी प्रथम वर्ग -1,अधिकारी झाल्याबद्दल शाळेच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

सन 2011-12या शैक्षणिक वर्षात तो उच्चं माध्यमिक परीक्षा प्रथम श्रेणीत प्रथम येवून विद्यालयाचा बहुमान वाढवला. मयूर विठ्ठलं वाघ हा आदिवासी भटक्या जमाती या प्रवर्गातील असून तो अतिशय कष्टाळू व प्रमाणिक आहे."मला माझ्या बांधवांची व समाजाची भरपूर सेवा करायची आहे. माझ्या जिवनात मी प्रचंड संघर्ष केला असून दारिद्र्य,व दुःखाचे घाव खूप सहन केले आहेत. घरात कलह आणि वडिलांच्या आजारपनाला झुंज देऊन अभ्यास नित्यनेमाने करतच होतो या वेळी . बाहेरचे विश्व् आणि मोबाईलचा मोठा त्याग केला, म्हणून आई -वडील आणि माझे गुरु आनंद जाधव सर, साबळे मॅडम, खंडागळे सर यांच्या मार्गदर्शनाने आज मी इथे पर्यंत मोठा झालो. असे सत्काराला उत्तर देतांना मयूर वाघ बोलत होते.

धसई रोड पासून ते शाळे पर्यंत सहवाद्य ढोल -तशाच्या गजरात मरवणुकीने मयूर वाघ यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला. शाळेचा इतिहासात आदिवासी प्रवर्गातील मुलांचा 8वी चा "कबड्डीचा संघ "मुलांचं विभागावर खेळणं "आणि mpsc परीक्षा देऊन



" प्रथम श्रेणीचे "अधिकारी होणे. ही बाब गौरवास्पद आहे. असे भावोदगार मुख्याध्यापक आनंद जाधव यांनी काढले. महेंद्र बेंद्रे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. या प्रसंगी वाघ यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. विद्यालयातील सर्व शिक्षक वृंद, पालक, व विद्यार्थी -विद्यार्थिनी उपस्थित होते.'वंदे मातरम 'या गीताने कार्यक्रमांची सांगता करण्यात आली.

## हरित आणि निल क्रांतीच्या युगात पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी - प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळूकर

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. २४ (वार्ताहर) पाणथळ जागा या पूरनियंत्रण, जलस्रोत संरक्षण आणि जैवविविधता टिकवण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. सध्याचे पर्यावरण पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवणे ही काळाची गरज आहे. हरित क्रांती आणि निळया क्रांतीचे युग सुरू असल्याने पर्यावरण संवर्धनाची जबाबदारी अधिक वाढली आहे, असे प्रतिपादन प्र. प्राचार्य डॉ. शशिकांत म्हाळूकर यांनी केले.**

ते पद्मश्री अण्णासाहेब जाधव भारतीय समाज उन्नती मंडळ संचलित बीएनएन महाविद्यालयात प्राणीशास्त्र विभाग, ग्रामीण विकास विभाग, भूगोल विभाग आणि पर्यावरण दक्षता मंच यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित डॉ. एम. एस. कोडारकर मेमोरियल व्याख्यानमालेत बोलत होते. कार्यक्रमाला पर्यावरण तज्ज्ञ डॉ. उमेश मुंडले, पर्यावरण दक्षता मंडळाच्या प्रतिनिधी पूर्णिमा शिरगावकर, सुरभी वालावलकर-ठोसर उपस्थित होते. डॉ. उमेश मुंडले म्हणाले, जलस्रोतांचे संरक्षण व संवर्धन ही आजची अत्यावश्यक गरज आहे. तलावांचे सुशोभीकरण करताना अनेक ठिकाणी भिंती बांधून तलावाची टाकी तयार केली जाते. यामुळे तलावातील नैसर्गिक झरे बंद होतात आणि तलावाचे आरोग्य खालावते. त्यामुळे तलाव, ओढे आणि इतर जलस्रोतांचे नैसर्गिक स्वरूप जपणे आणि त्यांचे पुनरुज्जीवन करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. यामुळे पर्यावरण संवर्धनाबरोबरच परिसराच्या सर्वांगीण विकासालाही चालना मिळते, असे त्यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमात पर्यावरण दक्षता मंचाच्या पदाधिकाऱ्यांनी संस्थेच्या उपक्रमांबाबत माहिती दिली. विद्यार्थ्यांनी पर्यावरणावर सादरीकरण करून मुद्दे मांडले. कार्यक्रमाला उपप्राचार्य डॉ. सुधीर निकम, डॉ. दिलीप काकवीपुरे, डॉ. आर. एल. रूपवते, प्रा. बी. के. पाईकराव, डॉ. तेजाली अयरे, मनाली धांगडे यांसह विद्यार्थी उपस्थित होते. प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ. सुवर्णा रावळ यांनी, तर पाहुण्यांचा परिचय डॉ. प्रसाद कर्णिक यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. गुलिस्ता अन्सारी रईस तर आभार डॉ. निनाद जाधव यांनी मानले.







नियमित वाचा दै. ठाणे जीवनदीप वार्ता

## बारवर पडला पोलिसांचा छापा

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता/कल्याण:** कल्याण पोलिस उपायुक्त कारवाई पथकाने रविवारी रात्री स्टेशन परिसरातील ताल लेडीज डान्सबारवर छापा टाकला. याठिकाणी १५ बारबाला होत्या. पोलिसांनी त्यांची सुटका केली आहे. बारमध्ये बारबालासह मॅनेजर, मालक, कॅशिअर, पुरुष वेटर आणि ग्राहक असे १३ जण होते. पोलिसांनी या प्रकरणात २८ जणांच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. महात्मा फुले पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

## सेंचुरी रेयॉन हायस्कूल येथे "राज्यस्तरीय शालेय रग्बी क्रीडा" स्पर्धेचे उद्‌घाटन

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, अंतर्गत जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, ठाणे द्वारा आयोजित राज्यस्तरीय शालेय रग्बी क्रीडा स्पर्धा 2025-26 चे आयोजन दि.21 ते 23 नोव्हेंबर 2025 या कालावधीत सेंचुरी रेयॉन हायस्कूल येथे करण्यात आले होते.

या स्पर्धेचे उद्‌घाटन दि.22 नोव्हेंबर 2025 रोजी उपायुक्त, क्रीडा उल्हासनगर महानगरपालिका श्रीम. स्नेहा कर्पे , वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष आव्हाड , आंतरराष्ट्रीय रग्बी खेळाडू श्री.सचिन म्हसकर यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी सेंचुरी रेयॉन हायस्कूलचे कार्यकारी प्रमुख श्रीकांत गोरे, सेंच्युरी रेयॉन चे वरिष्ठ उपाध्यक्ष श्री.मिलिंद भांडारकर, बी.के.बिर्ला महाविद्यालय तसेच शाळा व्यवस्थापनाचे मुख्याध्यापक तसेच संचालक कुलगुरू डॉ.नरेशचंद्र, सेंचुरी रेऑन शाळेच्या मुख्याध्यापिका वंदना बदाने, जिल्हा क्रीडा अधिकारी सुवर्णा बारटक्के,पर्यवेक्षक आदी मान्यवर उपस्थित होते.

या स्पर्धेत महाराष्ट्रातील आठ विभागांमधून मुलामुलींचे एकूण सोळा संघ सहभागी झाले होते. या संघांमधून मुलींच्या गटात लातूर विभागाला प्रथम क्रमांक प्राप्त झाला असून नागपूर तसेच छत्रपती संभाजी नगर यांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झाले. तर 14 वर्षाखालील मुले या गटात प्रथम क्रमांक कोल्हापूर या विभागास प्राप्त झाला असून लातूर व मुंबई या विभागांना अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त झाले.

ठाणे जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांच्या नाविन्यपूर्ण संकल्पनेमधून स्पर्धेत सहभागी सर्वच आठही विभागातील खेळाडूंना उत्तम प्रतीचे ट्रॅक सूट देण्यात आले. तसेच स्पर्धेतील प्रथम,द्वितीय व तृतीय क्रमांक प्राप्त विजेत्या खेळाडूंना सन्मानचिन्ह, मेडल आणि प्रत्येक विजयी खेळाडूला "स्मार्ट वॉच" देण्यात आले.

ही स्पर्धा अत्यंत उत्साहाने खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली.या स्पर्धेकरिता जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ तसेच सेंचुरी रेयॉन हायस्कूलचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभले.



**या स्पर्धेचे उद्‌घाटन दि.22 नोव्हेंबर 2025 रोजी उपायुक्त, क्रीडा उल्हासनगर महानगरपालिका श्रीम. स्नेहा कर्पे , वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.संतोष आव्हाड , आंतरराष्ट्रीय रग्बी खेळाडू श्री.सचिन म्हसकर यांच्या हस्ते करण्यात आले.**

## मानसिक ताण-तणाव वाढत असल्यास ‘टेलिमानस’ हेल्पलाइन क्रमांक नागरिकांसाठी २४×७ उपलब्ध

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : लोक ताण-तणाव, चिंता, नैराश्य, नातेसंबंधातील समस्या, परीक्षेचा दबाव, आर्थिक तणाव किंवा स्मृतिसंबंधित अडचणी यांसारख्या भावनिक आव्हानांविषयी खुलेपणाने बोलू लागले आहेत, ही सकारात्मक बदलाची चिन्हे आहेत. मानसिक आरोग्य महत्वाचे असल्याची जाणीव वाढत असून वेळेवर मदत घेणे ही सुदृढतेकडे जाणारी महत्त्वाची पायरी ठरत आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हा परिषद, ठाणे अंतर्गत आरोग्य विभागाने नागरिकांना मानसिक आरोग्याविषयी अधिक सजग राहण्याचे आणि गरज भासल्यास तात्काळ तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे आवाहन केले आहे.

जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. कैलास पवार यांनी सांगितले की आजच्या धावपळीच्या आयुष्यात मानसिक आरोग्याकडे दुर्लक्ष केल्यास अनेक गंभीर समस्या निर्माण होतात. सुरुवातीची लक्षणे ओळखून त्वरित मदत घेतल्यास नैराश्य, भीती, ताण-तनाव यांसारख्या स्थितीवर योग्य वेळी नियंत्रण मिळवणे शक्य होते. मानसिक आरोग्य हा व्यक्तीच्या एकूण आरोग्याचा अत्यंत महत्त्वाचा घटक असून त्याकडे गांभीर्याने पाहणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

केंद्र सरकारतर्फे उपलब्ध करून देण्यात आलेली ‘टेली-मानस’ टोल फ्री हेल्पलाइन १४४१६ ही मोफत सेवा सर्वसामान्यांसाठी २४×७ उपलब्ध आहे. प्रशिक्षित मानसोपचारतज्ञ व समुपदेशक या क्रमांकावर त्वरित मार्गदर्शन करून नागरिकांना मानसिक ताणातून बाहेर पडण्यासाठी मदत करतात. कोणत्याही प्रकारच्या मानसिक अस्वस्थतेसाठी ही सेवा निःसंकोचपणे वापरण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी केले आहे.

टेली-मानसद्वारे उपलब्ध सेवा :

- मानसिक ताण-तणाव आणि चिंता
- नैराश्याची प्रारंभिक किंवा गंभीर लक्षणे
- व्यसनाधीनता समस्या
- कौटुंबिक किंवा नातेसंबंधातील तणाव
- मुलांमधील मानसिक समस्या
- परीक्षेचा ताण
- अत्याधिक विचार, भिती, अस्वस्थता
- आत्महत्येचे विचार / तातडीची भावनिक अस्थिरता
- आर्थिक किंवा वैयक्तिक तणाव
- इतर कोणत्याही प्रकारच्या मानसिक आरोग्य समस्या

## खडवली येथे सात फुटी अजगराला सर्पमित्रांकडून जिवदान

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पडघा** : भिवंडी तालुक्यातील मध्य रेल्वेच्या खडवली स्टेशनकडे जाणाऱ्या व रात्रंदिवस वर्दळ असलेल्या रस्त्यालगत असलेल्या एका शेतात भल्या मोठ्या बिनविषारी अजगराला सुरक्षित पकडुन सर्पमित्रांकडुन जिवदान देण्यात आले.

वाहुली येथे शनिवारी अजगर पकडल्याची घटना ताजी असतानाच पडघा - खडवली रस्त्यावर रविवारी रात्रीच्या वेळी मातोश्री वृध्दाश्रमाच्या बाजुला असलेल्या सुदाम कृष्णा दिनकर यांच्या शेतात एक ७ फुटाचा व १५ किलो वजनाचा भला मोठा बिनविषारी अजगर असल्याचे आढळून आल्याने परिसरात घबराटीचे वातावरण पसरले होते त्यानंतर नांगरीकांनी पडघा परिसरातील सर्पमित्र मयुर बजागे, रवि दांडगे, निवृत्ती बजागे यांना पाचारण केले होते. यावेळी सर्पमित्रांनी रात्रीच्या वेळेस मोठ्या शिताफीने अजगराला सुरक्षित पकडुन पडघा वन कार्यालयातील वन कर्मचारी महेंद्र मंगल भेरे, रमेश रसाळ यांच्या उपस्थितीत नैसर्गिक अधिवासात सोडून दिले सर्पमित्रांनी अजगराला पकडल्यानंतर परीसरातील घाबरलेल्या नागरीकांनी सुटकेचा निश्वास सोडला.तसेच अल्पावधीतच अजगराला सुरक्षित रीत्या पकडण्यात आल्याने नागरीकांनी सर्पमित्रांचे कौतुक केले.



## कमी पटसंख्या असलेल्या शाळांचे अस्तित्व धोक्यात

### गोरगरीबांची मुले होणार शाळाबाह्य

### - सुधीर घागस

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : शासनाने निश्चित केलेले संच मान्यतेचे नवीन निकष कायम ठेवत १४ नोव्हेंबर २०२५ म्हणजेच बालदिनाच्या दिवशी उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे खेडोपाड्यातील हजारो विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहणार असल्याचा धोका निर्माण झाला आहे. संच मान्यतेचे नवीन निकष जरी आरटीई कायद्यानुसार असले तरी ते दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणापासून वंचित ठेवणारे आहेत. त्यामुळे आरटीई कायद्यात सुधारणा करावी व गोरगरीब विद्यार्थ्यांना आपल्या नजीकच्या शाळेत शिकता यावे यासाठी शासनाने पुढाकार घ्यावा अशी मागणी असे शिक्षण क्रांती संघटनेचे राज्य अध्यक्ष सुधीर देवराम घागस यांनी मुख्यमंत्री, शालेय शिक्षणमंत्री, शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालकांकडे पत्राद्वारे केली आहे.

दि.१५ मार्च २०२४ रोजी शासन आदेश काढून आरटीई कायद्याचा आधार घेत शासनाने इ. १ ली ते १२ वी पर्यंतच्या वर्गांसाठी संच मान्यतेचे नवीन निकष निश्चित केले. या निकषांमुळे राज्यातील अनेक शाळा शिक्षकांविना बंद पडणार आहेत. दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना शिक्षण सहज मिळू शकणार नाही. त्यामुळे पुन्हा जुने दिवस येतील व गोर गरीबांची मुले शिक्षण प्रवाहाबाहेर फेकली जातील असा धोका सुधीर घागस यांनी व्यक्त केला आहे.

शिक्षण संचालकांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाचा हवाला देत दि. २० नोव्हेंबर रोजी पत्र काढून अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ५ डिसेंबर पर्यंत जिल्हास्तरावर व १९ ते २२ डिसेंबर या कालावधीत विभागस्तावर पूर्ण करण्याचे निर्देश क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. या तत्परतेमुळे राज्यभर शिक्षक समायोजनाचा गोंधळ तर उडणार आहेच परंतु विद्यार्थ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. बोर्ड परीक्षांच्या तोंडावर शासनाने चालवलेली शाळा बंद करण्याची तत्परता राज्याला शिक्षणाच्या दृष्टीने मागे घेऊन जाणारी ठरणार आहे. यामुळे राज्यभर असंतोष पसरला आहे. यासाठी मुख्यमंत्र्यांनी पुढाकार घेऊन शिक्षण मंत्र्यांसोबत चर्चा करून समायोजन प्रक्रिया थांबवावी अशी विनंती घागस यांनी केली आहे.

**या संच मान्यतेमुळे रत्नागिरी जिल्ह्यात १६५ शाळा बंद पडणार असून १९९२ विद्यार्थ्यांना घरापासून दूर शिक्षणासाठी जावे लागणार आहे. राज्यातील अशा अनेक शाळा बंद पडणार असून भविष्यात विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी पुर्वीप्रमाणेच वणवण करावी लागणार आहे.**

**- सुधीर देवराम घागस,**
**राज्य अध्यक्ष**
**शिक्षण क्रांती संघटना**

## शिक्षा एंड जनसेवा संस्था आणि एनटीटी ग्लोबल नेटवर्क यांच्या संयुक्त आयोजनात सरकारी शाळांमध्ये बेंच वितरण



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : येथील शिक्षा एंड जनसेवा संस्था यांच्या मार्फत आणि एनटीटी ग्लोबल नेटवर्क्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या CSR सहकार्याने उत्तर प्रदेशातील जौनपूर जनपदातील महाराजगंज परिसरातील पाच सरकारी शाळांमध्ये डेस्क–बेंच वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उत्तम शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे व शाळांच्या पायाभूत सुविधांना बळकटी देणे हा आहे.

कार्यक्रमाअंतर्गत प्राथमिक विद्यालय गोठवा, प्राथमिक विद्यालय भटपुरा, प्राथमिक विद्यालय लोहरीयां, पूर्व माध्यमिक विद्यालय भटौली आणि प्राथमिक विद्यालय रामदेइया या सरकारी शाळांमध्ये डेस्क–बेंचचे वितरण करण्यात आले.

या प्रसंगी शिक्षा एंड जनसेवा संस्था तर्फे सीए अखिलेश पांडेय, सुमित तिवारी, वासू पांडेय, अमन विश्वकर्मा, विरेंद्र कुमार सिंह, अखिलेश्वर जैसवार आणि लाल साहब यादव उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष सीए अखिलेश पांडेय यांनी सांगितले की सरकारी शाळांमधील विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण वातावरण मिळावे यासाठी संस्थेचे सहकार्य सातत्याने चालू राहील. त्यांनी पुढे सांगितले की आतापर्यंत 30 पेक्षा अधिक सरकारी शाळांमधील 2500 हून अधिक विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वितरण करण्यात आले असून, आगामी काळातही हा उपक्रम सुरू ठेवण्याचा संस्थेचा संकल्प आहे. शिक्षा एंड जनसेवा संस्था आणि एनटीटी ग्लोबल नेटवर्क यांचा हा पुढाकार ग्रामीण शिक्षण सशक्तीकरणाच्या दिशेने एक प्रशंसनीय पाऊल मानले जात आहे.

## कराटे बेल्ट परीक्षेत मुलींची बाजी

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**पेण** : आजच्या आधुनिक युगात मुलींना फॅशन, ब्युटी, डिझायनिंग यांसोबतच स्वसंरक्षणाचे प्रशिक्षण देणे अत्यावश्यक बनले आहे. नाशिकमधील मालेगाव, डोंगराळे गावातील लहान मुलीवरील अत्याचाराच्या पार्श्वभूमीवर मुलींना सक्षम बनविण्याची गरज अधिक प्रकर्षाने समोर येत आहे. याच अनुषंगाने पाणदिवे येथील पुंडलिक रामा पाटील शाळेत गोशिंन रियु कराटे असोसिएशनतर्फे कराटे बेल्ट परीक्षा पार पडली. या परीक्षेत उरण तालुक्यातील ५ ते १७ वर्ष वयोगटातील ११ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

विद्यार्थ्यांना काता, कुमिते, टेक्निक्स आदी स्वसंरक्षण कलांचे प्रशिक्षण देण्यात आले होते. क्षमतेनुसार विद्यार्थ्यांना बेल्ट प्रदान करण्यात आले. यलो बेल्ट प्राप्त करणाऱ्यांमध्ये स्वरा म्हात्रे, विश्रुत गावंड, तोफिक अली, पर्जन्य म्हात्रे आणि प्रार्थना ठाकूर यांचा समावेश आहे. साक्षी पाटील आणि निशा पाटील यांनी ऑरेंज बेल्ट मिळवला. आद्या ठाकूर व सृजा गावंड यांनी ग्रीन बेल्ट तर वेदा नवनीत पाटील हिला पर्पल बेल्ट देण्यात आला. रुद्र मोहन ठाकूर याला ब्राउन-४ बेल्ट प्रदान करण्यात आला.

परीक्षेसाठी असोसिएशनचे इंडिया अध्यक्ष सिहान राजू कोळी, तसेच सेन्साई गोपाळ म्हात्रे, शंपाय भूषण म्हात्रे आणि शंपाय राकेश म्हात्रे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय कराटे स्पर्धांमधील संधींबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

मुली आणि मुले कराटेमार्फत आत्मविश्वास, शिस्त आणि स्वसंरक्षण या गुणांचे बळकटीकरण करत असल्याने समाजात सुरक्षिततेकडे महत्त्वाचे पाऊल टाकले जात असल्याची भावना व्यक्त करण्यात आली. मुलांसोबतच मुलीही आता या क्षेत्रात पदार्पण करत आहेत सुरुवातीलाच या स्पर्धेत मुलींचा ही तितकाच प्रतिसाद मिळाला याबद्दल मुलींचेही तितकेच कौतुक करण्यात आले.




## विद्यार्थ्यांच्या कलागुणांना ‘एज्युकेशन प्लस’ चा वाव

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे** : विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, सर्जनशीलता आणि स्पर्धात्मक वृत्ती निर्माण करण्याच्या उद्देशाने एज्युकेशन प्लस क्लासेसचे संचालक रविंद्र प्रजापती यांचे मार्गदर्शनाखाली सावरकर नगर, ठाणे येथे आमच्या लाडक्या लेकी उपक्रमासह चित्रकला स्पर्धा, क्रिकेट स्पर्धा, विज्ञान प्रदर्शन, बुद्धीबळ स्पर्धा अशा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धांमध्ये लुईसवाडी व सावरकर नगर विभागाचे विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला असून विशेषतः बुद्धीबळ स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला. विविध गटांमध्ये उत्तम कामगिरी करणाऱ्या विजेत्यांनी आपले कौशल्य प्रभावीपणे सादर केले.

बुद्धिबळ स्पर्धेत लुईसवाडी शाखेच्या 5वी–6वी गट श्लोक उपाध्याय, 7वी–8वी गट : प्रिन्स गुप्ता, 9वी–11वी गट : अनंत विश्वकर्मा यांनी तर सावरकर नगर शाखेतील 5वी–6वी गटात अनिकेत यादव, 7वी–8वी गटात यश गुप्ता, 9वी–11वी गटात मंजीत यादव यांनी प्रथम क्रमांक पटकावला. सर्व विजेत्यांना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे पत्रकार अर्जुन चेमटे यांच्या हस्ते प्रमाणपत्र, ट्रॉफी व वृक्ष देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी स्पर्धेसाठी अमीचंद राजपूत सर, नन्दलाल प्रजापति सर, डॉक्टर उमेश प्रजापति सर, डॉक्टर गिरीश प्रजापति सर, अर्जुन यादव सर, रुपाली जाधव मैडम व क्लासेस चे सर्व शिक्षक आणि स्टॉफ मेंबर्स उपस्थित होते. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळत असून त्यांचा आत्मविश्वास, विचारशक्ती आणि सर्जनशीलता अधिक बळकट होत असल्याचे संचालक रविंद्र प्रजापती यांनी सांगितले. परिसरातील पालक व नागरिकांनी उपक्रमाचे कौतुक करत अशा कार्यक्रमांचे नियमित आयोजन व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली.




## ज्वेलर्सला घरी बोलवून लुटले

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : डोंबिवलीतील एका ज्वेलर्सला ऑर्डरसाठी आगाऊ पैसे देण्यासाठी घरी बोलावण्यात येऊन त्यांना ओलीस ठेवून नंतर लुटण्यात आले. ही घटना आझादेगाव येथील जय मल्हार इमारतीच्या पाचव्या मजल्यावर घडली.

२० नोव्हेंबर रोजी दुपारी, वैशाली जाधव नावाच्या एका वृद्ध महिलेच्या ओळखीच्या दोन पुरुषांनी वराही ज्वेलर्सचे मालक नारायणलाल रावल यांना ऑर्डरसाठी आगाऊ पैसे देण्यासाठी त्यांच्या घरी बोलावले. रावल दिलेल्या पत्त्यावर आला आणि त्याने त्याच्या आईची विचारपूस केली. मारहाण केली, ३ तोळे दागिने आणि ५० हजार रुपये रोख घेऊन पळून गेले. डोंबिवलीतील वराही ज्वेलर्सचे मालक नारायणलाल रावल यांच्या तक्रारीवरून मानपाडा पोलिसांनी एका महिलेसह तीन अज्ञात दरोडेखोरांविरुद्ध दरोड्याचा गुन्हा दाखल केला आहे आणि त्यांचा शोध सुरू आहे.

## राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी कल्याणच्या कृष्णाक्षी देशमुखची निवड

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**कल्याण** : कल्याणातील क्रीडा क्षेत्राच्या दृष्टीने एक मोठा आणि तितकाच अभिमानास्पद क्षण घडला आहे. युवा फुटबॉलपटू कृष्णाक्षी देशमुख हिची ज्युनिअर मुलींच्या राष्ट्रीय फुटबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्राच्या संघामध्ये निवड झाली आहे. कृष्णाक्षी ही नामांकित फुटबॉल अकादमी अशी ओळख असलेल्या एलीट स्पोर्टिंग अकादमीचे प्रमुख प्रशिक्षक आणि माजी राष्ट्रीय खेळाडू लेस्टर पीटर्स यांच्याकडे प्रशिक्षण घेत आहे. नागालँड येथे डॉ. तालीमेरेन आव ज्युनियर गर्ल्स नॅशनल फुटबॉल चॅम्पियनशिप होणार आहे. ज्यामध्ये देशभरातील विविध राज्यांचे फुटबॉल खेळाडू सहभागी होणार आहेत. तर देशातील फुटबॉल क्षेत्रामध्ये या राष्ट्रीय स्पर्धेला वेगळाच मान असून या स्पर्धेमध्ये एकदा तरी आपल्या राज्याचे प्रतिनिधित्व करावे अशी प्रत्येक युवा फुटबॉल खेळाडूची इच्छा असते. या पार्श्वभूमीवर कल्याणच्या कृष्णाक्षी देशमुखची झालेली ही निवड कल्याण-डोंबिवली परिसरासाठी मोठा सन्मान समजला जात आहे. कृष्णाक्षीने आपल्या फुटबॉल प्रवासाची सुरुवात 2021 मध्ये केली. एलिट स्पोर्टिंग अकॅडमीच्या नियोजनबद्ध आणि कौशल्यवर्धक प्रशिक्षण पद्धतीतून दिवसागणिक तिच्या खेळामध्ये सातत्याने सुधारणा होत गेली. तिची शिस्त, जिद्द आणि प्रगतीची धडपड यामुळेच तिला राज्यस्तरीय संघात स्थान मिळवता आल्याची भावना एलिट स्पोर्टिंग अकॅडमीतर्फे व्यक्त करण्यात आला.

कृष्णाक्षीचे वडील व्यंकटेश देशमुख हे व्यावसायिक अभियंता असून आई सोनाली देशमुख या गृहिणी आहेत. त्यांच्या प्रोत्साहन आणि पाठिंब्यामुळेच कृष्णाक्षीने आपल्या खेळातील प्रगतीचे शिखर गाठल्याचे अकॅडमीने सांगितले. तर एलाइट स्पोर्टिंग अकॅडमीने कृष्णाक्षीच्या या यशाबद्दल अभिमान व्यक्त करत तिला या आगामी राष्ट्रीय स्पर्धेमध्ये उत्तुंग यश मिळावे अशा शुभेच्छा दिल्या आहेत. कृष्णाक्षीच्या या निवडीनंतर स्थानिक पातळीवरील गुणी खेळाडू हेरण्याची आणि त्यांना चांगला खेळाडू म्हणून घडवण्याची वचनबद्धता एलिट स्पोर्टिंग अकॅडमीने पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे.






Printed by SIDDHAKALA PRINT SOLUTION LLP Published by GHODVINDE RAVINDRA NARAYAN on behalf of GHODVINDE RAVINDRA NARAYAN,
Printed at Thane and published at Building No-B-24, Room no-9, Gholap Nagar, Murbad Road, Near Anupam Nagar, Kalyan (West). Editor GHODVINDE RAVINDRA NARAYAN.
Contact No. - 908266 4781 / 9619188558 E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024